# विद्यार्थी विकास मंडळ,
# वार्षिक अहवाल २०२१-२२

### राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत सहभाग

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये महाविद्यालयातील प्रथम वर्ष विज्ञान वर्गातील विद्यार्थिनी कु. धनश्री राजेंद्र म्हसे हिने हुंडाविरोधी चळवळ, मुंबई या संस्थेतर्फे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत सहभाग नोंदविला.

### राष्ट्रगीत गायन ध्वनिचित्रफीत

विद्यापीठ अनुदान आयोग ,नवी दिल्ली यांच्याकडून आवाहन करण्यात आलेल्या "आजादी का अमृतमहोत्सव "या उपक्रमांतर्गत राष्ट्रगीत गायनाची ध्वनिचित्रफीत तयार करून ती आयोगाने दिलेल्या वेबसाईट वरती अपलोड करण्यात आली

### कोवीड प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेचे आयोजन

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात दिनांक २६ऑक्टोबर २०२१ते २७ऑक्टोबर २०२१दरम्यान विद्यार्थी विकास मंडळ ,राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने" मिशन युवा स्वास्थ्य "या अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी ,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी **कोवीड** प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले यामध्ये जवळपास तीनशे जणांचे लसीकरण झाले.

### वार्षिक नियतकालिका मूल्यांकन स्पर्धेत सहभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या नियतकालिका स्पर्धेत सहभाग नोंदविण्यात आला.

### सावित्री महोत्सव

दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी सावित्री महोत्सवांतर्गत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थिनी वसतिगृहात असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय शिंदे ,प्रबंधक कैलास पाचरणे ,विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. संदीप थोरात प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. प्रभाकर जगताप प्रा. रूपाली वायाळ व प्रा. प्रतिमा लोणारी उपस्थित होते.

तसेच दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत सावित्री महोत्सवानिमित्त प्राचार्य डॉ. संजय शिंदे यांचे "सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य " या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**मराठी भाषा गौरव दिन**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळ यांच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन , डॉ.संजय मोरे यांचे व्याख्यान, पत्र लेखन स्पर्धा, शब्द प्रतिभा विशेषांकाचे प्रकाशन आधी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन प्रभारी प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे डॉ. बाळासाहेब अनुसे प्रा. डी.एम. मारकड, प्रा. संदीप थोरात प्रा. प्रतीक्षा खराडे आणि विद्यार्थ्यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच डॉ. संजय मोरे (मराठी विभाग प्रमुख ,श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय बावडा, ता.इंदापूर ,जि. पुणे) यांनी आभासी पद्धतीने "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी" या विषयावर व्याख्यान दिले.

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मराठी विभागाच्या वतीने शब्द प्रतिभा या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले यानिमित्ताने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील ,उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, राजाभाऊ साबळे ,अरविंद दौंडकर ,प्रभारी प्राचार्य डॉक्टर संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचरणे ,डॉ. बाळासाहेब अनुसे ,प्रा. दिलीप मुळूक, प्रा.गणेश धुमाळ, डॉ. किर्ती नितनवरे, प्रा.प्रतिक्षा खराडे उपस्थित होते, याप्रसंगी बोलताना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की मराठी भाषेचे प्राचीनत्व अभ्यासकांनी सिद्ध केले असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हे समस्त मराठीजनांची भावना आहे. अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर मराठीचा अभ्यास, संशोधन ,साहित्य संग्रह अधिक प्रभावीपणे होऊन ग्रंथालय चळवळ सशक्त होईल.

**जागतिक महिला दिन**

महाविद्यालयात ८ मार्च २०२२ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत प्राध्यापिका वर्षा कांबळे यांचे महिला सक्षमीकरण या विषयावर व्याख्यान तसेच श्रीमती मीनाक्षी साळुंके यांचे योग प्रात्यक्षिक व प्राणायाम सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले.

**निर्भय कन्या अभियान**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या उपक्रमांमध्ये विद्यापीठस्तरीय निर्भय कन्या अभियान अंतर्गत निर्भय कन्या, जागरूक माता, सक्षम समाज या कार्यक्रमास दिनांक १३ एप्रिल २०२२ रोजी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्राध्यापिका प्रतिमा लोणारी व कु. साक्षी वीरकर, कु.नम्रता पाचारणे या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांनी फेब्रुवारी २०२२ महिनाअखेरपर्यंत राबविलेल्या निर्भय कन्या अभियानाची प्रोजेक्टर (पीपीटी)च्या साह्याने चित्रफीत दाखविण्यात आली. तद्नंतर स्त्री जीवनावर आधारित सामूहिक नृत्याचे विद्यार्थिनीनमार्फत सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डिसीपी, डॉ. रश्मी करंदीकर वरिष्ठ प्रशासिक अधिकारी, गृह विभाग या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान कुलगुरू डॉ.नितीन करमरकर यांनी भूषविले तर प्रस्तावना डॉ.संतोष परचुरे, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ यांनी केले. सोशल मीडियाचा वाढत्या वापरामुळे सोशल मीडिया जागरुकतेकरिता कार्यक्रमाचे आयोजन करणे, जवळच्या पोलीस स्टेशनची संपर्कात राहणे, मॅट्रिमोनियल वेबसाईट पासून सावधानता बाळगणे, कस्टम गिफ्ट मध्ये फसणाऱ्या महिलांचे वाढते प्रमाण, भ्रूणहत्या, सायबर स्टॉकिंग अशा विविध विषयांवर करंदीकर मॅडमने मार्गदर्शन करून विद्यार्थिनीशी चर्चेच्या माध्यमातून सुसंवाद साधला. आणि अशा सर्व कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयीन स्तरावरही झाले पाहिजे असे वक्तव्य डॉ.रश्मी करंदीकर यांनी आपल्या मनोगतात केले.

**मुद्रितशोधन कार्यशाळा**

विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे आणि मराठी विभाग हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११-१२ मे २०२२ दरम्यान दोन दिवसीय विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या दोन दिवसीय कार्यशाळेत डॉ. संजय शिंदे यांनी मुद्रित मुद्रितशोधनाचे महत्व, डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी शुद्धलेखनाचे नियम, प्राध्यापिका प्रतिक्षा खराडे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याधिष्ठित विकास होण्यासाठी भाषेचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक असून त्यांना वाचन, लेखन ,संभाषण ,संवाद कौशल्यांच्या स्वरूपातील भाषेचे उपयोजन प्रभावी पणे करता आल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात असे प्रतिपादन केले यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे ,विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख प्रा. संदीप थोरात, डॉ. राजेंद्र शिरसी, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. किशोर लांडे पाटील ,डॉ. विकास रासकर उपस्थित होते. या कार्यशाळेत सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
विद्यार्थी विकास मंडळाकडून चालू वर्षातील विविध परिपत्रकांची योग्य ती अंमलबजावणी करून त्यासंबंधीचे अहवाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सादर करण्यात आले.

प्रा. संदीप थोरात ,

विद्यार्थी विकास अधिकारी.